
# एस.पी. कॉलेजच्या विद्यार्थ्यांची 'क्विक हील फाउंडेशन'च्या क्लब ऑफिसरपदी शानदार निवड




पुणे : सर परशुरामभाऊ (एस.पी.) कॉलेज आणि डिजिटल सुरक्षा क्षेत्रातील अग्रगण्य 'क्विक हील फाउंडेशन' यांच्यात नुकताच एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (चेण) संपन्न झाला.

या भागीदारीचा भाग म्हणून, महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांची 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या विशेष उपक्रमांतर्गत 'क्लब ऑफिसर' म्हणून निवड करण्यात आली आहे. निवड झालेले हे चार मुख्य क्लब ऑफिसर्स आणि त्यांच्या सोबतीला असलेले १६ सायबर वॉरियर्स, असे एकूण २० विद्यार्थी या देशव्यापी जनजागृती अभियानात सक्रिय योगदान देणार आहेत.

या महत्त्वपूर्ण मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची विविध पदांवर नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये अवंती दळवी (प्रेसिडेंट), ईशा जोशी (सेक्रेटरी), चिन्मय

## सायबर सुरक्षेसाठी २० वॉरियर्स सज्ज

शेवाडे (ॲक्टिव्हिटी डायरेक्टर) आणि अन्वय आल्हाट (मीडिया डायरेक्टर) यांचा प्रामुख्याने समावेश आहे. या संपूर्ण उपक्रमाचे योग्य नियोजन आणि समन्वयाची महत्त्वाची जबाबदारी महाविद्यालयातील प्रा.कीर्ती गरूड यांच्यावर सोपविण्यात आली आहे.निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे नुकतेच विमाननगर येथील क्विक हील फाउंडेशनच्या कॉर्पोरेट कार्यालयात अतिशय दर्जेदार ऑफलाइन प्रशिक्षण आणि ओरिएंटेशन सत्र पार पडले. या सत्रादरम्यान फाउंडेशनचे तज्ज्ञ मार्गदर्शक अजय शिर्के, गायत्री केसरकर-पवार, दीपूसिंग व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रशिक्षणार्थींना सायबर सुरक्षेचे आधुनिक पैलू, तंत्रज्ञान आणि जनजागृतीच्या विविध पद्धतींचे सखोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना भावी सामाजिक कार्यासाठी विशेष शुभेच्छा दिल्या.

आजच्या वेगवान डिजिटल युगात इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या जितकी वेगाने वाढत आहे, तितक्याच गंभीरतेने सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही विस्तारत आहे. या वाढत्या धोक्याची दखल घेऊनच समाजात व्यापक स्तरावर जनजागृती निर्माण करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.